ISBN-978-81930154-3-5

बी. सी. यु. डी. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

व

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे,

न्यू आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, पारनेर

आयोजित

एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र ५ जानेवारी, २०१८

'आधुनिक महाराष्ट्रातील वंचितांचे इतिहास लेखन'

* आयोजक *

इतिहास विभाग

न्यू आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, पारनेर

जिल्हा अहमदनगर, ४१४३०२ (महाराष्ट्र)

अनुक्रमणिका

अ.क्र.	शोधनिबंक	संशोधकाचे नाव	पृष्ठ क्र.
१	Marginatization:Theory Concept and Development	डॉ. दिपक गायकवाड	१-८
२	शेतकरी चळवळीत शेतकरी संघटनेची भूमिका आणि आजची परिस्थिती	डॉ. के. एम. अंबाडे	९-१३
३	कोलाम एक आदिवासी जमात	डॉ. ए. के. मुंजुळकर	१४-१७
४	स्थानिक इतिहास लेखन व महत्तव	डॉ. एन. आर. मोकाटे	१८-२२
५	आधुनिम पिंपरी चिंचवडच्या इतिहासात आण्णासाहेब मगर याचे योगदान	डॉ. एस. एस. काळभोर	२३-२६
६	Colonial Approach to Indian History and Historiography	डॉ. रघुनाथ शेळके	२७-३७
७	छत्रपती राजर्षी शाहूचे वंचितांच्या उध्दारातील योगदान	डॉ. व्ही. एस. गोर्डे	३८-४३
८	केळूगण गावचा इतिहास	डॉ. आर. आर. सोनवणे	४४-४८
९	स्वतंत्रपूर्व काळातील कामगार चळवळीची वाटचाल	डॉ. एच. वाय. गायकवाड	४९-५२
१०	सेनापती दाभाडे घराण्याची मराठयांच्या इतिहासातील उपेक्षित एक अभ्यास	डॉ. एस. के. भांमरे	५३-५७
११	महात्मा फुले यांची शैक्षणिक कमगिरी	डॉ. आर. एम. कुरुमकर	५८-६२
१२	श्रीगोंद्याचा ऐतिहासिक अभ्यास	डॉ. एम. एम. जगदाळे	६३-७०
१३	भिमथडीच्या शेतकरी बंडाचा ज्ञात अविष्कार	डॉ. डी. ए. मोरे	७१-७३
१४	शेवगाव तालुक्याचा स्थानिक इतिहास	डॉ. एस. एन.मिरे , प्रा. एच.एन.जमाले	७४-८३
१५	महर्षी विठ्ठल रामजी शेतक-यांसाटीचे कार्य व आर्थिक धोरण	डॉ. मीना साळे	८४-८५
१६	कामगार चळवळ आणि नारायण मेघाजी लोखंडे	प्रा. बी. जे. काकडे	८६-८९

केळूंगण गावाचा इतिहास

प्रा.डॉ.राजाराम रामदास सोनवणे
(इतिहास विभाग प्रमुख)
अॅड.एम.एन.देशमुख महाविद्यालय राजूर,
ता.अकोले, जि.अहमदनगर.

१) देशमुखवाडी (केळूंगण) :-

अहमदनगर जिल्हयातील अकोले तालुक्यातील केळूंगण हे एक छोटेसे खेडे आहे. तेथील लोकसंख्या अदमास एक हजार दोनशे आहे. देशमुखवाडी ही या गावाची एक लहानशी वाडी असून ती राजूर या गावापासून २ किलोमीटर अंतरावर आहे. राजूर हे चाळीसगाव डांगणचे बाजारपेठ असल्यामुळे या गावाचे सर्व व्यवहार राजूर गावाशी निगडीत आहे.

या गावाच्या पश्चिमेला कळसुबाई शिखर, भंडारदरा धरण असून उत्तरेला प्रवरानदी वाहत आहे. येथे नव्यानेच झलेला वृध्दाश्रम व त्याची झालेली वैशिष्टयपुर्ण बांधणी हे या गावाचे वैशिष्ट्य ठरले आहे.केळूंगण या गावामध्ये देशमुख आडनावाचे लोक मोठया प्रमाणात राहत असून भातशेती हा त्यांचा मुख्य व्यवसाय आहे. येथे हंगामी भातशेती असल्यामुळे अनेक लोक मजुरीसाठी बाहेरगावी असलेले दिसून येतात.

१.१ ऐतिहासिक दस्तऐवज :-

या गावात लिखित स्वरुपात कोणताही दस्तऐवज उपलब्ध होऊ शकला नाही. परंतु ऐतिहासिक एस्तऐवज शोधत असता एक ऐतिहासिक घटना उजेडात आली. त्याची हकीगत अशी की, ब्रिटीश काळात पुणे, नगर, ठाणे, नाशिक जिल्हयाच्या आदिवासी भागात महादेव कोळी व भिल्लांच्या संघटना स्थापन झाल्या. कोणत्याही राजवटीत समरस न झालेलया महादेव कोळी व भिल्ल जमातींनी इंग्रजांविरुध्द बंडाचे निशाण उभारले होते. परंतु इंग्रजांविरुध्द बंडाचा पहिला उठाव जुन्नर भागात झाला. ही वार्ता या परिसरातील महादेव कोळी, ठाकर, भिल्ल समाजात पसरली. इस.१८३० साली जुन्नरला झालेल्या त्या बंडाचे नेतृत्व भाऊ खरे, चिमनाजी दरबारे व जाधव यांनी केले. आमचे भांडण कंपनी सरकार विरुध्द आहे. जनतेने त्यात सामील व्हावे असे त्यांनी जाहिर आवाहन केले. घोडेगाव ता.आंबेगाव जि.पुणे बिगर आदिवासी लोकांनी क्रांतीकारकांना मदत करण्याऐवजी कंपनी सरकारला मदत केल्यामुळे या लढ्यातील ५४ महादेव कोळी क्रांतीकारकांनी इग्रजांचा खजिना आणि तेथील अनेक गावे लुटली त्यामुळे इग्रजांनी त्यांचा मार्ग रोखून धरला व त्यांना कैद केले. इंग्रज अधिका-यांना या गोष्टीची चीड येऊन

ISBN No – 978-81930154-3-5

त्यांनी राघोजी भांगरे यांच्या आईचा अमानुष छळ केला या कृत्याची माहिती मिळताच सर्व महादेव कोळी व भिल्ल जमातीत असंतोष ऊफाळून आला. इंग्रजांना चांगला धडा शिकविण्यासाठी राघोजी भांगरे यास मदत म्हणुन बापु भांगरे यांच्या नेतृत्वाखाली क्रांतीकारकांची नवी संघटना स्थापन झाली. राघोजीचा उजवा हात समजला जाणारा बापू भांगरेचा यांचा फितुरीने घात झाला.

रोघोजीला पकडण्यासाठी ब्रिटीश सरकारने ५००० रुपयाचे बक्षिस ठेवले. पैशाच्या अमिषाने लोक फितुरी करतील व त्यात आपला घात होईल या भीतीन रोघोजीने वेषांतर केले. साधूच्या वेशात असताना ठाणे जिल्हयात राघोजीला पकडण्यात आले. राघोजीचा तर्क खरा ठरला पैशाने घात केला फितुरी झाली. अखेर ठाण्याच्या तुरुंगात राघोजीला फाशीची शिक्षा देण्यात आली.

१.२ गावाची रचना :-

केळूंगण हे गाव आस्वल्या डोंगराच्या कुशीत वसलेले आहे. या गावात प्रवेश गावाच्या वेशीपासून होतो. वेशीच्या बाहेर मारुतीचे मंदिर असून तेथे अनेक देवदेवतांच्या मुर्ती दिसून येतात. गाववेशीच्या बाजूलाच प्राथमिक व माध्यमिक शाळेची सुंदर इमारत उभी आहे. तेथूनच पाठीमागे केळूंगण गाव वसलेले दिसते. केळूंगण गावाच्या मध्यभागी दगडी चौथ-यावर सुंदर असे रामसीतेचे मंदिर आहे. त्याच्याच बाजूला नवीनच बांधकाम केलेली ग्रामपंचायत इमारत दिसते. गावात तीन आळया (पेठ) असून उतरत्या छताची कौलारु घरे दिसून येतात. भातशेती बरोबर येथे दुग्ध व्यवसाय केला जात असल्यामुळे घराजवळच जनावरांचे गोठे दिसून येतात. केळूंगण गावापासून साधारपणे दिड किलोमीटर अंतरावर पूर्वेला देशमुखवाडी आहे. तेथे अंगणवाडीची शाळा आहे. देशमुखवाडी येथे ३५ घरांची वस्ती असून तेथे देशमुख आडनावाचे लोक राहतात. हे सर्व लोक जातीने महादेव कोळी आहेत. गावात बलुतेदारांची संख्या नगण्य असल्यामुळे पारंपारिक बलुतेदारी येथे दिसून येत नाही.

१.३ गावाच्या नावाचा इतिहास :-

'केळूंगण' गावाच्या नावाचा इतिहास पाहिला असता त्यासंबधी काही दंतकथा सांगितल्या जातात. पुर्वी या गावात देशमुख, मांगे, भारमल, घोटकर, असे विविध वंशाचे लोक राहत असत. त्यामुळे प्रत्येक वंशाचा जातीनुसार वेगळा 'गण' होता. तसेच येथे पहिलवानांची संख्या मोठी होती. ते मोठया प्रमाणात केळी खात असत. त्यामुळे या गावाला केळी खाणारे लोक म्हणजेच केळूंगण असे नाव पडले.

ISBN No – 978-81930154-3-5

दुसरी आख्यायिका अशी सांगितली जाते की, नाशिक येथील अशोकवन प्रसिध्द होते, तर कोदणी, केळूंगण हे उपवन म्हणून प्रसिध्द होते. राम सीता वनवासात असताना ते फिरत ये गावात आले. त्यावेळी सीतामाईने या ठिकाणी आपला उपवास केळीच्या पानावर सोडला म्हणून य गाबाला केळूंगण असे नाव पडले. येथे गावामध्ये असणारे राम सीतेचे मंदिर त्याचीच साक्ष असल्याचे सोंगितले जाते.

नाशिक येथील पंचवटी हे मुख्यवन आणि कोदणी ते केळूंगण या परिसराला उपवन समजले जात असे. प्रभुरामचंद्राने सीतामाईला वनवासाला पाठविले. त्यावेळी सीतामाई ऋषींच्या आश्रमात तातोबा येथे राहिल्या. लव व कुशला जेथे बाण (तीर) चालविण्याचे शिक्षण दिले ते तेरुंगण आणि त्यांना खेळण्यासाठी जे क्रीडांगण होते त्याचा अपभ्रंश होऊन केळूंगण असे नाव पडले अशीही एक दंतकथा सांगितली जाते. 'देशमुखवाडी' येथे देशमुख आडनावाचे लोक मोठया संख्येने राहत असल्यामुळे तिला 'देशमुखवाडी' असे नाव पडले आहे.

१.४ मंदिरे :-

केळूंगण गावात एकुण पाच मंदिरे आहेत. त्यामध्ये १) राम, लक्ष्मण, सीता २) भवानी मात ३) मारुती ४) गारुडी ५) वाघोबा इत्यादी देवतांची मंदिरे पहावयास मिळतात.

१.५ मंदिरांचा इतिहास :-

१) राम, लक्ष्मण, सीता :-

केळूंगण गावामध्ये मध्यभागी दगडी चौथ्य-यावर राम-लक्ष्मण-सीतेचे अत्यंत सुबक अ नक्षीकाम केलेले मंदिर आहे. मंदिराच्या समोर वडाचे झाड असुन त्या झाडाखाली शनिदेव आहे. श शनिवारी शनिदेवावर तेल घातले जाते. चैत्र महिन्यात रामनवमीला रामजन्मसोहळा येथे साजरा केल जातो. यावेळी भजन, किर्तन आदी कार्यक्रम केले जातात. हे मंदिर प्राचीन असून १९९५ साली मंदिराच दुरुस्ती केली असे सांगितले जाते.

२) मठातील भवानी :-

ही केळूंगण गावातील लोकांची कुलदेवता मानली जाते. या देवीचे मंदिर माळेगाव, कातळापू व केळूंगण या तीन गावाच्या शिवेवर आहे. या तीनही गावाचे हे कुलदैवत असल्यामुळे माघ महिन्यात पौर्णिमेला येथे यात्रेनिमित्त मोठी गर्दी होते. या मंदिराचे बांधकाम २००७ साली केळुंगण गावचे सुपु मा.ॲड. मनोहरराव नानासाहेब देशमुख यांनी स्वखर्चाने केले.

ISBN No – 978-81930154-3-5

३) मारुती मंदिर :-

जुने मारुतीचे मंदिर उध्वस्त झाल्यानंतर नवीन मारुतीची स्थापना राम, लक्ष्मण, सीता या मंदिरात केली.

४) गारुडीदेव :- गारुडीदेव आस्वल्या डोंगरावर आहे. या ठिकाणी पूर्वीच्या काळी एक गारुडी मरुन पडला होता. म्हणून तेथे गारुडी देवाची स्थापना झाली. हे मंदिर १९४६ साली बांधण्यात आले. या ठिकाणी डोंगरावर एक पाण्याचा हौद आहे.

५) वाघोबा देव :-

वाघोबा देवाचे छोटे मंदिर असून वाघोबाची मुर्ती लाकडी आहे.

१.६ प्राचीन मुर्ती :-

केळूंगण गावात प्रवेश करण्यापुर्वी शाळेसमोरील टेकडीवर आपणांस मारुतीची प्राचीन भंगलेली मूर्ती दृष्टीस पडते. या मुर्तीच्या संदर्भात दंतकथा सांगितली जाते की, या गावाच्या बाहेर मारुतीचे मोठे मंदिर होते, या मंदिरातील मारुती अतिशय दैदिप्यमान होता. या मारुतीचे दर्शन घेण्यास स्त्रियांना बंदी होती. या मारुतीला पाहण्यासाठी एक स्त्री आस्वल्या डोंगरावर गेली. तिची नजर मूर्तीवर पडताच मारुतीची मूर्ती दुभंगली तद्नंतर एक मोठा भूकंप झाला. त्यात हे मंदिर उध्वस्त झाले. या मूर्तीजवळच एक शिवलिंग व नंदी असल्याचे दिसून येते. या मारुती मंदिराची पूजा त्याकाळी मांगे लोक करत असत आजही त्यांचे वंशज केळूंगण येथे राहत आहेत.

प्राचीन मारुतीच्या मूर्ती शेजारी अनेक प्राचीन मूर्ती पडलेल्या दिसतात. त्या मूर्तीचे निरिक्षण केले असता त्यात राम, लक्ष्मण, सीता यांच्या मूर्ती कोरलेल्या दिसतात.

१.७ ग्रामदैवताची माहिती :-

देशमुखवाडी (केळूंगण) गावचे ग्रामदैवत मठातील भवानी आहे. भवानीमातेचे हेमंदिर प्राचीन आहे. माळेगाव, कातळापूर, केळूंगण गावाच्या सरहद्दीवर असलेले हे मंदिर या तीन गावाचे श्रध्दास्थान आहे. या देवीची यात्रा माघ महिन्यातील पौर्णिमेच्या दिवशी भरते. यावेळी तीन्ही गावातील लोक मोठया संख्येने या ठिकाणी येतात.

भवानी मातेच्या मंदिराचे नुतनीकरण (जिर्णोध्दार) २००७ साली ॲड्. एम.एन.देशमुख यांच्या स्वखर्चातून पूर्ण केले. हे मंदिर छोटेसे असून देखणे आहे. मंदिराचा कळस तांब्याचा असून आतील मूर्ती अतिशय सुंदर आहे. यात्रेच्या काळात तमाशा, कुस्ती अशा स्वरुपाचे कार्यक्रम होतात. आता मंदिराची व्यवस्था ठेवण्यासाठी पुजा-याची नेमणूक केली आहे.

१.८ गावाची शाळा :-

ISBN No – 978-81930154-3-5

केळूंगण या गावामध्ये वेशीच्या बाजूला जिल्हा परिषद व माध्यमिक शाळेची इमारत आहे. माध्यमिक शाळा १० वी पर्यंत असून ही शाळा ज्ञानगंगा विद्या प्रसारक मंडळ, केळूंगण ही संस्था चालविते. शाळेचे नाव जयभवानी माता विद्यालय आहे. येथे केळूंगण बरोबरच आजुबाजूच्या वाडया-वस्त्यांवरिल मुले शिक्षण घेत आहेत.

केळूंगण प्रमाणेच देशमुखवाडी येथेही जिल्हा परिषद अहमदनगर यांची इयत्ता ४ थी पर्यंत प्राथमिक शाळा आहे. आता येथे अंगणवाडी शाळा सुरु झाल्यामुळे लहान मुलांचीही शिक्षणाची सोय झाली आहे.

१.९ केळूंगण गावाच्या श्रध्दा - समजुती :-

केळूंगण गावातील लोकांचे ग्रामदैवत भावानीमातेवर अढळ अशी श्रध्दा आहे. तसेच गावातील राम, लक्ष्मण, सीता मंदिर, भैरवनाथ मंदिर, मारुती मंदिर, गवळी देव या दैवतांवरही त्यांची श्रध्दा दिसून येते.

तसेच काही समजुतीही येथे रुढी परंपरेने पाळल्या जातात. त्यामध्ये

१) रिकामा हंडा आडवा गेल्यावर चांगले काम होणार नाही असे मानले जाते.

२) दोन साळुंक्या पाहिल्यावर दिवस चांगला जातो. आणि एक साळुंकी पाहिल्यावर दिवस वाईट जातो अशी त्यांची समजूत आहे.

३) रात्रीच्या वेळी टिटवी ओरडल्यावर एखादी वाईट घटना घडणार आहे किंवा शेजारच्या गावात वाईट गावात वाईट घटना घडली असावी असे मानले जाते.

४) मुंगसाचे तोंड पाहिल्यावर तो दिवस आनंदी जातो. असा समज येथे दिसून येतो.

१.१० पारंपरिक खेळ :-

१) टेंभा पेटवून गावाला फे-या मारणे याला विरोळा खेळ म्हणत असत.

२) ढोल लेझिम व कांबडनृत्य हे खेळ खेळले जात. आता येथे फक्त ढोल, लेझिम हा खेळ खेळला जातो.

३) दस-याच्या वेळी देवीची स्थापना झाल्यावर टिप-यांचा खेळ खेळला जातो.

४) कोल्हाट उडया हा एक पांरपारिक खेळ येथे खेळला जात असे.

१.११ गावातील तरुण मंडळे / धार्मिक मंडळे :-

ISBN No – 978-81930154-3-5

केळूंगण गावामध्ये जय हनुमान व रामायण तरुण मंडळ आहे. यातील रामायण तरुण मंडळ यात्रेच्यावेळी भारुडाचा कार्यक्रम सादर करते. तर भैरवनाथ भजनी तरुण गावामध्ये होणा-या विविध कार्यक्रमाच्यावेळी भजनाचे कार्यक्रम करतात.

देशमुखवाडी (केळूंगण) गावाचे ऐतिहासिक लेखन करण्यासाठी शिलालेख, ताम्रपट, ऐतिहासिक वाडे, विरगळ यांचा शोध घेण्यात आला. परंतु येथे या गोष्टी शोधूनही सापडल्या नाही.